# ★ भदान-संगीत ★

. ठाणें
५०६
REFBK-0011956
REFBK-0011956



मुलांच्या मेळाव्यांत संत विनोबा.

किंमत १ आणा. ] [ नवे सहा पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...२८७८८... दि: ...३/८/५५...
क्रमांक ...९८०६... नों. दि: ...१५/७/५५...

## (१) निघालों पुण्य यात्रेला

निघालों पुण्य यात्रेला, प्रभो दे सुयश कार्याला
प्रभातीं प्रार्थना प्रभुला, मिळूं दे सुयश आम्हाला ॥धृ॥

उठा रे झोपलेल्यांनो, जमाया नवजवानांनो
जमीनीच्या सवालाच्या, नव्या ह्या घोषणा ऐका
जमीनी सर्व गांवाच्या, जमीनी राबणारांच्या
जमीनीच्या सवाला, नव्या ह्या घोषणा ऐका ॥
॥ निघालों ॥

दा. क्र. ११९५६

शिवाजीच्या महाराष्ट्रा, तुझें तें शौर्य जाणूं दे
नवी ही क्रांति आली रे, पुढें ये साथ आम्हा दे
अरे या क्रांति युद्धाची, दवाई नीट ध्यानीं घे
अहिंसा शस्त्र गांधींचें, सुनीति ढाल हातीं
॥ निघालों ॥

हरिश्चंद्राचिया देशा, बली कर्णाचिया देशा
अरे या भूमिहीनांची, मनींची पूर्ण करि आशा
विनोबांच्याच रुपानें, उभा हा देव दुनियेचा
तुझ्या दारीं तुझा भाऊ—तया दे भाग जो त्याचा
(पर्याय) नको परतून त्या लावूं—
तया दे भाग जो त्याचा

॥ निघालों ॥

REFBK-0011956
REFBK-0011956

—शाहीर अण्णा कुळकर्णी

## (२) धर्मचक्र फिरलें

धर्मचक्र फिरलें पडतां एकाकी पाऊलें ।
और विनोबा यती विनोबा भू-दानाचा घोष करित चालले
एकाकी पाऊलामागुनी लक्षावधि चालले ॥

खुललीं दहा दिशांचीं दारें
फुलले नव तेजानें वारे
हंसले आनंदानें तारे
तृणांतृणांतुन कणांकणांतुन मंत्र नवे उमलले
पडतां एकाकी पाऊलें ॥

नभाचा कोण धनी एकला ?
सांठविल कोण जगांतिल जला ?
वायूचा मालक कोणी भला ?
सबै भूमि गोपालकी । गर्जत जन चालले
पडतां एकाकी पाऊलें ॥

दलितांनीं हि दिलें दान याजला
ओळखुनि काळाच्या पाऊला
धनिक हो दान कराया चला
भूमि-दान हा धर्म युगाचा मर्म खरें यांतलें
पडतां एकाकी पाऊलें ॥

कवि—वसंत बापट

## (३) सुरम्य शांति लाभण्या

सुरम्य शांति लाभण्या, जमीन द्या, जमीन द्या
महान क्रांति टाळण्या, जमीन द्या, जमीन द्या
रक्त-क्रांति टाळण्या, जमीन द्या, जमीन द्या ॥ ध्रु०॥

भूमि ही दिल्याविना दरिद्रता न दूर हो।
भूमि ही दिल्याविना न द्वेषभाव नष्ट हो।
भूमिहीन लोक हे तयांस भूमि काम द्या।
कुदळ घेउनी भुजांचि शक्ति आजमावुं द्या।
महाविकास साधण्या, जमीन द्या, जमीन द्या
नवा प्रकाश पाहण्या, जमीन द्या, जमीन द्या

२

जमीन द्या, जमीन द्या, समाज आग्रहा धरी।
'भूमिदान द्या आम्हां' सदैव मागणी करी।
जमीन मातृरूपिणी पुनीत ही पवित्र ही।
पाणी वायु वा नभा समान देवदत्त ही।
पवित्र कर्म साधण्या, जमीन द्या, जमीन द्या
नवीन धर्म धारण्या, जमीन द्या, जमीन द्या

३

समत्व हो जनांमधें म्हणूनि भूमि ही हवी ।
माय-भू-महत्त्व राखण्या स्वराज्य तें भुवीं ।
मनुजतेस मानण्या जमीन द्या, जमीन द्या ।
किसान दुःखि हा बहू म्हणून भूमि दान द्या ।

विपन्न निःस्व यांजसाठीं भूमि द्या, जमीन द्या
क्षुधार्थ विश्व त्याजसाठीं भूमि द्या, जमीन द्या ।

४

भूमि देऊं शान्तिनें नवा समाज स्थापुं या ।
भूमि देऊनी जगा नवीन मार्ग दावुं या ।
प्रेमयुक्त तें समत्व सिद्धि ही च साधवूं ।
भूमिदान देऊनी कृपाण तेवि लाजवूं ।

सुरम्य शान्ति लाभण्या, जमीन द्या, जमीन द्या
महान क्रांति साधण्या, जमीन द्या, जमीन द्या
रक्त-क्रांति टाळण्या, जमीन द्या, जमीन द्या

अनु. पु. मोहनी —दिनकर

# (४) नवें विश्व निर्मू आतां

धनिकांनो, गरिबांनो या, भूमि-दानयज्ञामधुनि,
नवें विश्व निर्मूं आतां । नवें विश्व निर्मूं ।।धृ०।।
आकुंचित स्वार्थाची दृष्टि दूर करूं । दूर करूं ।।
कसेल त्याची जमीन हा जयघोष करूं ।
जय घोष करूं ।
प्रेमानें, अति हर्षानें भूमि कसणाऱ्यांना देऊं । नवें०
ध्वज समतेचा आनंदानें उंच धरूं । उंच धरूं ।
दुभंगलेल्या मानवतेला एक करूं । एक करूं ।
घरा-घरांतिल अंधारीं, दीप मंगलाचा उजळूं । नवें०
शेतीला जे झाले असतिल पारखे । पारखे ।
हक्क तयांचे देऊं त्यांना सारखे । सारखे ।
विश्व-भेद हे मालवूं या । बंधूभाव आपण निर्मूं । नवें०
आप-तेज-वायु ही दौलत सकळांची । सकळांची ।
ती च वाट लावूंया आपण शेतीची । शेतीची ।
आणि उद्यांच्या समतेचा, रक्तरहित पाया घालूं । नवें०

—बाबा मोहोड

## (५) आहे किती छान, बाबा भूमीचें हें दान

आहे किती छान, आहे किती छान,
आहे किती छान, बाबा भूमीचें हें दान।
विनोबाचें बाण, विनोबाचें बाण, विनोबाचें बाण बाबा
भूमीचें हें दान।

शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो उठा आतां सारे
उत्साहाचें अंगीं तुमच्या येऊं द्या तें वारें
कामाचे हे ढीग पडूं द्या, पाहतील सारे बा रे
उठवूं या रान, उठवूं या रान, उठवूं या रान बाबा
भूमीचें हें दान ॥१॥

गरीब कोणी येथें नाहीं धनीक कोणी येथें नाहीं
राज्य ऐसें समतेचें जें होईल तें तूं पाही
भूमीचें तें दान देऊनि पावन व्हा लवलाही
माती सोनें मान, माती सोनें मान, माती सोनें मान बाबा
भूमीचें हें दान ॥२॥

विनोबांची साथ आहे तुझ्या पाठीशीं
समतेचा हा डंका झडतो दाहीं दिशाशीं
भारताचा प्रयोग नवखा करूं या यशस्वी
देऊनियां दान, देऊनियां दान, देऊनियां दान बाबा
भूमीचें हें दान ॥३॥

## (६) देश उद्धरावया

देश उद्धरावया । रामराज्य व्हावया
भूमि-दान-यज्ञ हा । मार्ग एक शांतिचा ॥ धृ० ॥

अन्य देश क्रांतिनें । अस्त्रशस्त्र शक्तिनें
नागवूनियां जगा । इच्छितात वैभवा
एक यद्ध संपतें । तों च अन्य येत तें
काय हें असें जिणें । मानवास शोभतें ॥ १ ॥

बुद्धिवाद सांगतो । सूज्ञ म्हणूनि मिरवितो
अन्य दुःख जाणतो । जाणुनी हि नेणतो
माय बाप ईस्वर । बांधवें परस्पर
तत्त्व सांगतो नर । करित व्यर्थ संगर ॥ २ ॥

क्षुद्र स्वार्थ साधनीं । नित्य दंग होउनि
क्षुद्र श्वापदाहुनि । क्रूरता करीत तो
जाग जाग तूं झणी । मोह नीज सोडुनी
ना तरी विनाश हा । अटळ आज तं पहा ॥ ३ ॥

## (७) शेतकरी बाया आम्ही कामकरी बाया

गांवकरी बाया आम्ही शेतकरी बाया कामकरी बाया ।
नाहीं आम्ही राहणार आतां दीनवाणी गाया ।। धृ० ।।
सरकारला सांगू आम्ही
समाजाला सांगू आम्ही
पोरां बाळां हवें आमुच्या पोटभर खाया ।। १ ।।
आजवरी खाल्ल्या लाथा
आतां करूं वर माथा
शोषक दुनियेचे आतां मनसुबे जातिल वायां ।। २ ।।
अन्न नसे वस्त्र नसे
ना घर औषध तसें
परि अतां न राहिल दुःखाची ती छाया ।। ३ ।।
खपेल तो आधीं खाईल
नवीन धर्म हा येईल
वाळूं खोटी सोन्याची, घटोत्कची माया ।। ४ ।।
अडाणी न राहूं कोणी
गरीब न राहूं कोणी
ज्ञान हवें भूमि हवी दीन दशा जाया ।। ५ ।।
कडेवरी मुलें घेऊं
क्रांतींत सामिल होऊं
भूमिदान यज्ञामध्यें अर्पू आम्ही काया । ६ ।।

## (८) बंधूनो ! करूं चला भू-दान

(जाता–कोकिळा)

करूं चला भू-दान
बंधूनो ! करूं चला भू-दान ... ॥ धृ० ॥

कसेल त्याला । जमीन द्या हो
खपेल त्याला । सुखी करा हो
विषमता ही । मुळीं न राहो
धरूं या एक च ध्यान ... ॥ १ ॥

ईश्वर निर्मित । जमीन सारी
कसेल त्याचा । हक्क तिजवरी
निष्क्रियतेच्या । आज आहारी
येत आपदा महान् ... ॥ २ ॥

कसतो कोण ? नि खातो कोण ?
मौज भोगतो । सारी कोण ?
ही का संस्कृति अपुली छान !
हा का धर्म हि आपुला छान !
स्वार्थें भूलला भान ... ॥ ३ ॥

प्र. अ. भारती,
'कुमार कवि'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## (९) मंत्र आज हा नवा

( शिग फुंकिलें रणीं )

भूमिदान ! भूमिदान ! मंत्र आज हा नवा
झोपडचांत, बंगल्यांत, जंगलांत नांदवा ॥१॥
शिग क्रांतिचें नव्या फुंकण्यास व्हा पुढें
जिंकण्यास विश्व-शांति या क्षणास व्हा खडे ॥२॥
युगांयुगांनीं लाभते सारखी या पर्वणी
घ्या धुवूनी हात सारे वाहत्या या जीवनीं ॥३॥
अज्ञान अन् दरिद्रता व्हावयाची नष्ट ना ?
या नव्या क्रांतींतुनीं आज घ्या ही प्रेरणा ॥४॥
आणि व्हा सारे उद्यांच्या नव्या मनुचे पायिक
जीवनींच्या मंगलाचे व्हावया उपासक ॥५॥

—बाबा मोहोड

## (१०) व्हारं पुढं

(चाल—जीवन की नांव ना डोले)

भूमिदान यज्ञ कराया। व्हारं पुढं चलारं चला या ॥धृ०॥
क्रांतीचें आलें वारें चमकले नवे तारे
निनादलें रान सारें आतुरलें विश्व सारें
नवे परिणाम बघाया। नवें नवें तेज पहाया, व्हारं पुढं ॥१॥

क्रांतिची ही लाट नवी देश सारा पेटवी
जिवनांस फुलवुनिया भावनेस चेतवी
तींत तुम्ही भाग घ्यावया । जीवनांस शुद्ध कराया
व्हारं पुढं ॥२॥
अनायासे प्रकटला दारापुढं संत
श्रीमंतांनो वाटूं द्या हो कांहीं तरी खंत
समता निर्माण करूं या । शांति निर्माण करूं या
व्हारं पुढं ॥३॥
गरिबांचें राज्य करूं, श्रमिकांचें कष्ट हरूं
सत्य, न्याय, विश्व प्रीति, नीति निर्माण करूं
सुराज्याचा भरूं या पाया । भूमिदान यज्ञांतुनियां
व्हारं पुढं ॥४॥

—बाबा मोहोड

## (११) सबै भूमि गोपालकी

सबै भूमि गोपालकी । नको कुणाची मालकी ।
द्यारे द्यारे वाटुन द्या । घ्यारे घ्यारे वाटून घ्या ॥ धृ ॥
सूर्य चंद्र नभ वायु लहरी । झुळझुळणारा जसा झरा
तशी देणगी परमेशाची । सर्वांकरितां वसुंधरा ॥ १ ॥
धनवंतानो भूमंतानो । अत्तां मालकी तुम्ही विसरा ।
सेवक भूचे बनूंया सारे । मालक प्रभू तो श्रेष्ठ खरा॥२॥

नवक्रांतीची अैका नौबत । परंपरा संस्कृती स्मरा
हविर्भाग अर्पिण्यास अपुला । चला उठा रे त्वरा करा।।३।।
अुंच नीच मग कोणी न राहील। सर्वोदय होईल खरा ।
विश्वशांतिचा नवा यज्ञ हा । भूदानानें सफल करा ।।४।।

## (१२) सबै भूमि गोपालकी

सबै भूमि गोपालकी । नव्या युगाचा मंत्र हा च कीं
नव्या मनूचा घोष हा च कीं। कसेल त्याची जमीन ।।धृ०।।
देवानें आकाश निर्मिलें । प्रकाश देतो रवि भगवान् ।
धरती माता तशी अन्न दे ।
तिजवर सत्ता कोणाची ? ।
घाम तिथें आराम शोभतो। घाम तिथें सुख राम नांदतो ।
कसेल त्याची जमीन ।।१।।
भारत-वर्षामधें यापुढें । ऐश-आरामी जिणें नको ।
गरीब श्रीमंताचा झगडा ।
भारतांत व्हावया नको ।
वैर पशूसहि लाजविणारे करीत आलों आजवरी
पर्याय रक्त पिणारी युद्ध चंडिका पूजित आलों आजवरी
म्हणून विनोबा म्हणती भारता भूदानाचा मार्ग धरी
माणुसकीचा मार्ग धरी
म्हणा मुखानें करुन दावा कसेल त्याची जमीन ।।३।।

—शाहीर अण्णा कुळकर्णी

## (१३) पत्ता बदलला !

( चाल–झाला महार पंढरीनाथ )

ऐका ऐका त्या देवाची मात ।
गेला सांगूनि पंढरीनाथ ॥ धृ० ॥

मी सहज बैसलों ध्यानीं । भाव भक्ति मनीं चिंतोनी ।
पहावया देव न्याहाळोनी । झाला प्रकाश अंधारांत ॥१॥

देव स्फूर्तिरूपी बोलला । ऐकोनी आनंद झाला ।
जिव कळवळोनि हा आला । लागली ज्योत गगनांत ॥२॥

'मी होतों पूर्वि मंदिरीं । आतां राहतों श्रमिकादारीं ।
खाउनी शिळ्या भाकरी । राहतों शेतांत अति मौजेंत ॥३॥

माझा कधिचा पत्ता बदलला । लोक वेडे जाति तीर्थाला ।
हा निरोप द्या सकलाला । करा सेवा मिळुनि खेड्यांत ॥४॥

तुकड्यानें ऐकोनि ध्वनी । केला आवाज हा गर्जोनी ।
गरीबांची हांक घ्या कानीं । तरि देव नेईल मोक्षांत ॥५॥

—तुकड्यादास

## (१४) भूमंतानो, श्रीमंतानो !

भूमंतानो, श्रीमंतानो
भूमि-धनाचें दान करा
भू-दानाचा यज्ञ धडकला
आहुति द्याया पुढें सरा ॥१॥
श्रमिक जनांची युगायुगांची
तंद्री ती रे असे भंगली
सामर्थ्याची प्रेरक जाणिव
जीवन्मृत जनिं संचरली ॥२॥
दधीचि मुनिच्या देहत्यागें
असुर सुरांचें युद्ध संपलें
अमीर-गरीबांमधल्या वैरा
होमाया हें ऋषि सजले ॥३॥
यज्ञांतुनि जें उरेल त्यातें
अमृत जाणुनि स्वीकारा
यज्ञावांचुनि भोग रोग तो
जाणुनि त्यातें धिक्कारा ॥४॥

भूमि सगळी गोपाळाची
भूमिजनांची, ग्रामजनांची
ज्याची त्याजला द्याल ना तरी
अखेर सारी जायाची ॥५॥
जें जायाचें तें देण्याचें
धैर्य करा. मनिं प्रेम धरा
कण देतां शत गुणित करूनी
उचलूनि देई माय धरा ॥६॥

## (१५) बहु वेळ नसे कामाची

भूदान करा धनदान करा ही पुकार घ्या श्रमिकांची
बहु वेळ नसे कामाची ॥धृ०॥
आज सांगती विनंति करूनी त्यागी संत पुढारी
कोण सांगतो वेळ उद्यांच्या जनतेची ललकारी
बहु वेळ नसे कामाची ॥१॥

सर्व मिळोनी बंधु म्हणोनी नांदू आपुल्या देशीं
करा करा तातडी मित्रहो वेळ न द्या परक्यासी ।
बहु वेळ नसे कामाचा ॥२॥

उपवाशी पोटाचा अग्नी, पाप पुण्य समजेना
शांतिनें क्रांति न झाली तर आवरी कोण धिंगाणा ।
बहु वेळ नसे कामाची ॥३॥

श्रमिक चिडतील मधें च अडतील पडेल भूमि रिकामी
मार्ग मिळेना करील जनता होऊनिया अविचारी ।
बहु वेळ नसे कामाची ॥४॥

रक्त वाहुनी नको क्रांति ती म्हणुनी याचना सगळी
भूदानाला यश ना ये तर येई तें च कपाळीं ।
बहु वेळ नसे कामाची ॥५॥

समाज हा समतोल असावा मानव जगण्यासाठीं
तुकड्यादास म्हणे सुजनांनो ऐकूनी बांधा गांठीं ।
बहु वेळ नसे कामाची ॥६॥

—तुकड्यादास

## (१६) मेहनत सेवा राम की

मेहनत सेवा राम की
मेहनत भक्ति राम की,
मेहनत पूजा राम की;
जागो प्यारे भारतवाले
( हाथोंवाले पाँवोंवाले )
खोलो बंद दिलों के ताले
अब न घड़ी आराम की। मेहनत पूजा...
मेहनत यमुना-गंगा जानो, मेहनत काशी-काबा मानो
धूम बड़ी इस धाम की। मेहनत पूजा...
मेहनत जीवन की निर्माता
मेहनत ऋद्धि-सिद्धि की दाता
कहती गीता श्याम की। मेहनत पूजा...
मेहनत मनमोहन ने कीनी
लकड़ी काट गुरु-दक्षिणा दीनी
सेवा सुबह-शाम की। मेहनत पूजा...

मेहनत जैसी औषध नाहीं
तन मन का सुख मेहनत माहीं
चीज़ बड़ी है काम की । मेहनत पूजा…
मेहनत-दान करो रे भाओ,
सन्त विनोबा ने दी दुहाओ ।
श्रद्धा यह बे-दाम की । मेहनत पूजा…

—दुखायल

## (१७) इसीमें सबका है कल्याण

प्रेमभावमय सुनो प्रार्थना । दे दो भूमिदान
इसीमें सबका है कल्याण ।। धृ०।।

तन-मन-धन से भूमिदान दो । दान करो भाई ।
भाई-भाई मिल कर रहना, रीत सही ये ही ।
नाम देश का उज्ज्वल होगा, होगा गौरव गान ।। १ ।।
आज़ादी भी पा कर हमको, चैन नहीं भाई ।
अन्न नहीं है, वस्त्र नहीं है, सुख नहीं कोई ।
स्वार्थ मोह, मद, मत्सर छोडो, झूठा है अभिमान ।। २ ।।
हाथ जोड़ कर यही प्रार्थना, तुमको अब भाई ।
भूमिदान यह यज्ञ सुमंगल पुण्य करे कोई ।
दान करो अब, काम करो सब और बढाओ नाम ।
इसीमें सबका है कल्याण ।। ३ ।।

## (१६) मेहनत सेवा राम की

मेहनत सेवा राम की
मेहनत भक्ति राम की,
मेहनत पूजा राम की;

जागो प्यारे भारतवाले
( हाथोंवाले पाँवोंवाले )
खोलो बंद दिलों के ताले

अब न घड़ी आराम की। मेहनत पूजा...

मेहनत यमुना-गंगा जानो, मेहनत काशी-काबा मानो
धूम बड़ी इस धाम की। मेहनत पूजा...

मेहनत जीवन की निर्माता
मेहनत ऋद्धि-सिद्धि की दाता

कहती गीता श्याम की। मेहनत पूजा...

मेहनत मनमोहन ने कीनी
लकड़ी काट गुरु-दक्षिणा दीनी

सेवा सुबह-शाम की। मेहनत पूजा...

मेहनत जैसी औषध नाहीं
तन मन का सुख मेहनत माहीं
चीज़ बड़ी है काम की । मेहनत पूजा···

मेहनत-दान करो रे भाओी,
सन्त विनोबा ने दी दुहाओी ।
श्रद्धा यह बे-दाम की । मेहनत पूजा···

—दुखायल

## (१७) इसीमें सबका है कल्याण

प्रेमभावमय सुनो प्रार्थना । दे दो भूमिदान
इसीमें सबका है कल्याण ।। धृ०।।

तन-मन-धन से भूमिदान दो। दान करो भाई ।
भाई-भाई मिल कर रहना, रीत सही ये ही ।
नाम देश का उज्ज्वल होगा, होगा गौरव गान ।। १ ।।
आज़ादी भी पा कर हमको, चैन नहीं भाई ।
अन्न नहीं है, वस्त्र नहीं है, सुख नहीं कोई ।
स्वार्थ मोह, मद, मत्सर छोडो, झूठा है अभिमान ।। २ ।।
हाथ जोड़ कर यही प्रार्थना, तुमको अब भाई ।
भूमिदान यह यज्ञ सुमंगल पुण्य करे कोई ।
दान करो अब, काम करो सब और बढाओ नाम ।
इसीमें सबका है कल्याण ।। ३ ।।

## (१८) भूमि-दान-यज्ञ

आज इक् फकिर की जो भूमि की पुकार है,
पुकार है यह दीन की, यह देश की पुकार है,
पुकार दीन-हीन की, न अब भुलायेंगे,
भूमि-दान यज्ञ हम सफल बनायेंगे ॥ १ ॥
बापुकी थी जो कल्पना, वह सत्यकी स्वराज्य की।
यह संत जोड़ने चला, लड़ी वह रामराज्य का।
संत के कदम पै हम कदम बढ़ायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥२॥
आज है चतुर्दिशा में गूंज साम्यवाद की,
कत्ल से, कानून से, खूनी क्रांति-नाद की।
किन्तु हम तो करुणा का ही पथ बनायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥३॥
प्रेमसे हो भूमिदान, प्रेम से ही क्रान्ति हो,
विश्व का कलह मिटे, फिर सदा को शान्ति हो।
हम मनुज को शान्ति की सुधा पिलायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥ ४ ।

जिसके भूमि है नहीं, उसे भी भूमि चाहिअे,
सबको वायु चाहिअे, सबको आयु चाहिअे।
अब किसी के भाग को न हम दबायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥५॥

भूमी-दान माँगना न भीख का प्रकार है
जिसके भूमि है नहीं, उसे भी स्वाधिकार है,
भूमि देके अपना फर्ज हम निभायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥६॥

भूमि-दान दो, मिले नयी जगतको जिन्दगी,
भूमि-दान दो, मिले नयी मनुजको जिन्दगी।
भूमि-दान दे, जगत का विष भगायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥७॥

भूमि-दान देंगे दूसरोंसे भी दिलायेंगे।
खुद जियेंगे और दूसरोंको भी जिलायेंगे।
भूमि-दान दे, धरा पे स्वर्ग लायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥८॥

सबके पास हो धरा, सभी के पास धाम हो,
सबको अन्न-वस्त्र हो, सभी के पास काम हो।

११०५६

हम सदा सभीकाही उदय मनायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे, ॥९॥
द्वार-द्वार नग्नपद जो दीन हेतु जा रहा,
यह बुद्ध है या गांधी है जो प्रेमगीत गा रहा,
इस 'विनोबा' संत पै सब कुछ लुटायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥१०॥
सत्य शान्ति की दिशा में यह नया प्रयोग है,
सन्त का प्रयास है, यह एक सुसंयोग है।
उठ पड़ो ऐ! भारतीय, जग जगायेंगे,
भूमि-दान-यज्ञ हम सफल बनायेंगे ॥११॥

——रघुराजसिंह

## (१९) गीत

भूदान गंग की धार रे।
सन्त विनोबा लाये जग में प्रभु-करुणा की धार रे—भू०—
बंगाली मदरासी आओ, किसी प्रान्त के वासी आओ।
कोई भाषा बोल रहे हो, आ जाओ यह गंग नहाओ॥
भारतीय बनकर निकलोगे, होगा मोद अपार रे—भू०—

हिंदू मुस्लिम सिक्ख इसाई, किसी धर्म के हो अनुयायी ।
हरिजन हो या हो सवर्ण तुम,एक बार यदि गंग नहायी।।
निकलोगे मनुष्य बनकर, हो मानव धर्म प्रसार रे–भू०–

रूसी चीनी या जापानी, अमरीकी या इँगलिस्तानी ।
जग के किसी भाग के वासी,पी लो इसका पावन पानी ।।
एक बूंद पीते दरसेगा, विश्व एक परिवार रे–भू०–

अणु-बमपर दम भरनेवालो, हिंसाका जप करनेवालो ।
इस गंगामें घुसकर ढूंढ़ो, तो वह प्रेम-अस्त्र तुम पालो ।।
जो अजेय, होगा जिसके बल, मंगलमय संसार रे–भू०–

अरे दूर ही रहनेवालो, इस पर शंका करनेवालो ।
निकट बैठ इसकी गति देखो,शंका-समाधान यों पालो ।।
हल सम्पूर्ण समस्याओं का ठीक करे यह धार रे–भू०–

जीवन भर यदि पाप किया हो,दुर्जनताका पाठ पढ़ा हो ।
छल-प्रपंचके मिथ्या बलपर निन्दनीय व्यापार किया हो।।
डुबकी मारो हाथ लगेगा, सदाचार-भण्डार रे—भू०—
इस गंगा का पावन दर्शन, अन्त:पट खोलेगा तत्क्षण ।
मज्जन मानस-मल धो देगा,पान करे मानस परिवर्तन ।।
इससे सुलभ समान सभीको परमपिता का प्यार रे—भू०—

—–श्री रामाश्रय दीक्षित

## (२०) सर्व मिळोनी काम करूं

सर्व मिळोनी काम करूं। धनधान्यानें देश भरूं
सर्व मिळोनी खाऊं या । एकजुटीनें नांदू या ।
एकी नांदो गांवांत । बंधुभाव हो सर्वांत ।
एकीनें सुख सर्वांस । बेकीनें होई नाश ।
एक उपाशी एक सुखी । एकी नांदावी कैशी ।

एक राबतो एक बसे । देवाघरचा न्याय नसे ।
जमीन आहे देवाची । जमीन साऱ्या गांवाची ।
अर्ध उपाशी शेजारी । अपुलीं भावंडें सारीं ।
भूमिदान द्या प्रेमानें धन ही द्या हो प्रेमानें ।
साम्ययोग हा मंत्र जपूं । तन मन धन देशा अर्पूं ।
रूप पालटूं गांवांचें । नंदनवन करूं देशाचें ॥

## (२१) भूमिदान की पुकार

(तर्ज—प्यारा हिंदुस्तान है)

पुकार भूमिदान की, यह देश के किसान की ।
सुजान की, अन्जान की, यह लहर है तूफान की ॥धृ०॥
धन को बाँटने चली, विषमता काटने चली ।
बेकारी उच्चाटन की, है बड़ी यह कामकी ॥१॥

भूख को मिटायेगी, दुख को हटायेगी।
देश के निर्माण में है, राह बड़ी शान की ॥२॥
हक़ का खिलायेगी, नेक से चलायेगी।
श्रम के जमाने में भूमि होगी प्यारी प्राण की ॥३॥
प्यारे भूमि-मालिको, पहिचानते हो काल को।
दो साथ भूमि-दान को, यह बात है जहान की ॥४॥
भूमि दो दिल खोल के, अपनी नेकी तौल के।
छोटी-मोटी बात नहीं, क्रान्ति है जहान की ॥५॥
वक्त गमा जाओगे, आगे धोका खाओगे।
तुकड्यादास कहता है, बातें रामबाण की ॥६॥

—संत तुकड़ोजी

## (२२) सम्पत्ति-दान

धनवाले ! ओ धनवाले !!
धनवाले ! धन-सम्पति बाँटो !
बाँटो सुख, स्वराज्य !
माँग रहा है दरिद्रनारायण !
यह अब और आज ! ऐ धनवाले !

तूने जो कुछ अपना माना।
संग नहीं सब तेरे जाना।
कुदरत का एहसान चुकाओ।
देश निमित्त कुछ देओ-दिलाओ।
भूखा राम पुकार रहा है।
पहचानो आवाज! ऐ धनवाले।

मेहनत की जो कौड़ी-कौड़ी–
मेहनत वालों ने है जोड़ी।
खोलो अब वह बन्द तिजोरी।
कुछ खाओ, कुछ दे दो थोड़ी।
बन्द न अब वह रहने वाली।
करलो यह अंदाज! ऐ धनवाले।

और की मेहनत कैसे पचेगी ?
पेट पं पत्थर बनके रहेगी।
आखिर में वह कष्ट ही देगी।
फोड़ा बन कर फूट पड़ेगी।
फिर तो आपरेशन निश्चय है।
है न छिपा यह राज! ऐ धनवाले॥

सोचे भला क्यों मरनेवाला ।
कुछ जो कल है करनेवाला ।
मोह-ममता से कुछ न बनेगा ।
देना, एक ही साथ चलेगा ।
अन्त में नहीं तो दुख ही देगा ।
यह सारा सुख-साज ! ऐ धनवाले ।।

हाथ से देगा, यश पायेगा ।
मोह रखेगा, पछतायेगा ।
दान से दीन-दुनिया सुधरेगी ।
चारों और कीर्ति फैलेगी ।
इससे होगा पूर्ण भैया ।
तेरा मेरा काज ! ऐ धनवाले ।।

सम्पत्ति-दान करो तुम भाई ।
सन्त विनोबा ने दी दुहाई ।
देश की प्राप्ति देश ही खाये ।
कोओी अलग पूँजी न बनाये ।
पत्थर बाँध क्यों कोई डूबे ।
आओ अिससे आज । ऐ धनवाले ।।

——दुखायल

('धरती की पुकार' से)

अनुक्रमांक 2/148
1506 नों. दि.

## (२३) नौजवान दौड़ आना रे

नौजवान दौड़ आना रे,
सुन लो विनोबा का गाना रे ।।
जिधर उधर भारत में भूखमरी छा गई ।
उसको मिटाने की वक्त अब आ गई ।
भूदान शंख बजा देना रे,
चढ़ा लो अपना वीर बाना रे ।।१।। नौजवान०
भूमिदान यज्ञ यहां शुरू किया गया ।
सभी नेताओं ने समर्थन इसका किया ।
तेरी आहुति चढ़ा देना रे,
सर्वोदय का मंत्र गाना रे ।।२।। नौजवान०
तू ही कृष्ण जमाने में गोपाल हुआ था ।
बैयालीस की क्रांति में जेल गया था ।
अभी वैसा साथ देना रे,
चढ़ा लो अपना निशाना रे ।।३।। नौजवान०
श्रम सत्य प्रेम का राज्य फैलाना ।
सुख शांति गंगा में खूब नहलाना ।
भू पर रामराज्य लाना रे,
सब को मिले काम, खाना रे ।।४।। नौजवान०

इसीलिए विनोबाने तुझ को पुकारा ।
भूदान यज्ञ पहले सफल करो सारा ।
जीवन अपना बहा देना रे,
न्यौछावर हो जाना रे ॥५॥ नौजवान०

—वरटकर गुरुजी

## (२४) ग्रामराज्य दशक

शरीर मन आरोग्य सफाई घर गांवची ।
व्यवस्था मळ-मूत्राची कचऱ्याची खताची हि ॥१॥
खाण्यापिण्याच्या वस्तूंची उणीव कधीं ही नसो ।
शेती व पशुपक्ष्यांची नेहमीं प्रगति असो ॥२॥
घरोंघरी चरख्याचा नाद कर्णीं सदा पडो ।
तसें चि दुसरे सर्व ग्रामोद्योग फळो फुलो ॥३॥
शिक्षण बाळबालांचें तेजस्वी प्राणवान् बनो ।
प्रौढ स्त्री पुरुषांदी हि उद्योगी ज्ञानवान् बनो ॥४॥
कास्तकार मजूरांचा प्रथम मान सदा असो ।
मेळ हिंदु अहिंदूंत जातिभेद कधीं नसो ॥५॥
नरांचा आणि नारींचा दर्जा हि सारखा असो ।
श्रीमंती आणि दारिद्र्य इतिहासांत आढळो ॥६॥

गांवांत झगडे तंटे पंचायतमुळें मिटो ।
गांव सर्व हि लोकांचे कोणी छोटा बडा नसो ॥७॥
देशांदेशांत झगडे युद्धें आदि घडूं नये ।
विज्ञानाची व प्रेमाची नेहमीं प्रगति असो ॥८॥
देशाच्या अन् व्यक्तींच्या हितांत झगडा नसो ।
शक्ति संयम सत्याची सर्व ईशकृपें फळो ॥९॥
रचनात्मक कामाचें वर्णन हें असें असें ।
अहिंसक स्वराज्याचें यांत तत्त्व समाविलें ॥१०॥

कि. घ. मशरूवाला

## भूमि-दान यज्ञ घोष वाक्यें

आमच्या गावांत-भूमि मालक ।
कोणी न राहील-कोणी न राहील ।
जमीन कोणाची ? देवाची, गांवाची ।
जमीन कोणाची ? कसेल त्याची ।
संपत्ति कोणाची ? राबेल त्याची ।
आम्ही सगळे बहीण भाऊ । जमीन धन वाटून घेऊं ।
भूख बेकारी । आतां न सहणार ।
जमीन, धन । वाटून घेणार ।
भू-दान-यज्ञांत । जमीन द्या ।
भू-दान यज्ञ । सफल करा ।

कदम बढ़ेंगे कैसे ? क्रांति से पर शांति से ।
यह होगा कैसे ? समझाकर प्रेम से ।
सबै भूमि । गोपाल की ।
सब संपत्ति । रघुपति की ।
भूमि क्रांति–सफल करेंगे ।

पाऊस पडतो—सर्वांसाठीं
वारा वाहतो—सर्वांसाठीं
सूर्य उगवतो—सर्वांसाठीं
तशीच जमीन—सर्वांसाठीं
देवासाठीं—गांवासाठीं

गरीबी दूर भगायेंगे—दुनिया नई बसायेंगे ।
क्रांतिचा हा पावन क्षण–सन सतावन सन सत्तावन

## गांव समाजाचा संकल्प

आमच्या गांवांत बिना जमीन
कोणी न राहील कोणी न राहील
आमच्या गांवात बिन रोजगार
कोणी न राहणार कोणी न राहणार
छोटे बड़े का भेद—जल्दी मिटेगा
ग्रामराज्य कायम होगा—रामराज्य होकर रहेगा ।

REFBK-0011956
REFBK-0011
११०५६
२८१९८ वि: ...
९४०६ ... ९४।३।६४

## (१) भूदान-यज्ञ समग्र दर्शन

भूदान विचाराचें परिपूर्ण माहिती करून दे
पुस्तक. किं. १ रु

## (२) ऐकीनें रहा आणि नेकीनें वागा

खेडेगांवच्या लोकांना समजेल अशा सोप्या भा
त्यांच्या नित्य जीवनाला वळण लावणारें पू. विनोब
प्रवचन. किं. ०–३–०

## (३) साहित्यिकांशीं हितगुज

साहित्यिकांच्या समोर झालेली पू. विनोबांची
भाषणें. किं. ०–१०–०

## (४) १९५७ च्या क्रांतीचा उषः काळ

अर्थात भूदान यज्ञाचें नव संस्करण.

किं. ०–४–०

वि
सं.

---

प्रकाशक—भाऊ पानसे, परंधाम विद्यापीठ, पवनार (वर्धा)
मुद्रक—मोहनलाल भट्ट, राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा